*लोकमान्य टिळकांप्रमाणे ज्ञानार्जन हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे असे म्हणत विद्यार्थ्यांनी प्रगतीची कास धरावी – आ. सुधीर मुनगंटीवार*

*लोकमान्य टिळक महाविद्यालय वणी येथे विविध प्रयोगशाळांचा व ऑक्सीजन पार्कचा उदघाटन सोहळा संपन्न*

=====================================================================

कोणत्याही महाविद्यालयाचे मुल्यांकन जेव्हा आपण करतो तेव्हा त्या महाविद्यालयाच्या माध्यमातुन किती विद्यार्थी धनसंपन्न झाले हे महत्वाचे नसते तर किती विद्यार्थी ज्ञानसंपन्न, गुणसंपन्न झाले हे महत्वाचे असते. वणीच्या लोकमान्य टिळक महाविद्यालयाने गेली अनेक वर्षे सातत्याने ज्ञानसंपन्न, गुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याचे मोलाचे काम केले आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे अशी सिंहगर्जना केली होती. आज विद्यार्थ्यांनी एक पाऊल पुढे जात ज्ञानार्जन हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे असे म्हणत प्रगतीची कास धरावी असे आवाहन माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

दिनांक 8 फेब्रुवारी रोजी वणी येथे लोकमान्य टिळक महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, संगणकशास्त्र, इंग्रजी, वाणिज्य व संशोधन केंद्राच्या नविन प्रयोगशाळांच्या उदघाटन समारंभात आ. सुधीर मुनगंटीवार बोलत होते. यावेळी ऑक्सीजन पार्कचे उदघाटन सुध्दा करण्यात आले. मंचावर आदिवासी विकास विभागाचे माजी मंत्री प्राचार्य अशोक उईके, वणीचे आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र नगरवाला, रमेश अणे, लक्ष्मण भेदी, अशोक सोनटक्के, दत्तात्रय सुरावार, प्रमोद देशमुख, उमापती कुचनवार, रमेश बोहरा, अनिल जयस्वाल, विवेकानंद मांडवकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खानझोडे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार पुढे म्हणाले, ज्या महाविद्यालयात मी डी.बी.एम. चे शिक्षण घेतले त्याच महाविद्यालयात उदघाटन समारंभासाठी येण्याचे सौभाग्य मला लाभले. त्या एक वर्षाच्या आठवणी माझ्यासाठी संस्मरणीय आहे. अशा आठवणी, क्षण जीवनात परत येत नाही. प्रत्येकाच्या जडणघडणीत महाविद्यालय, शाळांच्या संस्कारांचे मोठे योगदान असते. लोकमान्य टिळक महाविद्यालय हे वणीचे वैभव आहे. डॉ. अग्नीहोत्री, शब्दप्रभू प्राचार्य राम शेवाळकर अशा महनीय व्यक्तींनी या महाविद्यालयाच्या उत्कर्षासाठी योगदान दिले आहे. या महाविद्यालयातुन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांनी समाजहितासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. खानझोडे यांनी केले. यावेळी माजी मंत्री प्राचार्य अशोक उईके, आ. संजीवरेड्डी बोदकुरवार यांचीही भाषणे झालीत. कार्यक्रमाला वणी येथील नागरिकांची, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.